# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# भावपूर्ण श्रद्धांजली



**स्वर्गीय श्री.प्रकाशराव राजाराम पाटील**

आमच्या कोयना एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष श्री.प्रकाशराव पाटील (भाऊ) यांचे अल्पशा आजाराने शुक्रवार दि.१९ डिसेंबर २०२५ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.
त्यांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली...!

अध्यक्ष, जनरल सेक्रेटरी, जॉईंट सेक्रेटरी, सर्व संचालक मंडळ,
प्राचार्य, सर्व प्राध्यापक,सर्व शाखांचे मुख्याध्यापक,
शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी वर्ग व कोयना संस्था परिवार

**कोयना एज्युकेशन सोसायटी**
**पाटण, ता.पाटण, जि.सातारा**

# निष्ठावंत जीवनाचे सेवाभावी व्रतस्थी : प्रकाशराव पाटील

**पाटण पंचायत समितीचे माजी उपसभापती तसेच येथील कोयना एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष प्रकाशराव राजाराम पाटील तथा भाऊ (वय ८५) यांचे शुक्रवार १९ रोजी अल्प आजाराने पाटण येथील निवासस्थानी निधन झाले. तालुक्यातील जनमानसात ते 'प्रकाशभाऊ' म्हणून परिचित होते. त्यांच्या कार्याविषयी...**

४०-४५ वर्षांपूर्वी दुर्गम, मागास असलेल्या पाटण तालुक्यात माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या तत्कालीन राजकीय परिवर्तनाच्या कालखंडात माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांचे ते बिनीचे शिलेदार होते. विक्रमसिंह पाटणकर यांचे खंदे समर्थक असलेल्या भाऊंनी चाफळ विभागातील पाडळोशी गावचे सरपंचपद तसेच १९७२ ते १९७९ या काळात पंचायत समितीचे सदस्य तर १९७९ ते १९९० अशा प्रदीर्घ कालखंडात पंचायत समितीच्या उपसभापतीपदाची धुरा यशस्वीपणे सांभाळली.

कोयना एज्युकेशन सोसायटीच्या उपाध्यक्षपदी कार्यरत असलेल्या भाऊंनी जनमानसात मिळून मिसळून सामाजिक, धार्मिक, सहकार तसेच शैक्षणिक क्षेत्रात प्रभावी काम केले. समाजातील सर्व घटकांशी संपर्क असलेले प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व लाभलेल्या भाऊंनी विक्रमसिंह पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली चाफळ विभागाच्या विकासात मोलाचे योगदान दिले. कोयना एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण, आधुनिक शिक्षणाबरोबरच क्रीडा, संस्कार आणि सामाजिक मूल्यांसाठी सदैव आग्रही राहिले.



राजकीय क्षेत्रात जनतेविषयी संवेदनशील लोकसंपर्क जपणारे नेते म्हणून त्यांची अखेरपर्यंत ओळख राहिली. सामाजिक क्षेत्रातही त्यांनी अनेक उपक्रम राबवून ते उत्कृष्ट पद्धतीने सुरू ठेवले. गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, आरोग्य शिबिरे व सामाजिक ऐक्याला चालना देणाऱ्या विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांनी समाजात सर्वांसाठी आदर्श निर्माण केला.

या वयातही ते जनतेच्या समस्या ऐकून घेऊन त्या सोडवण्याची त्यांची तत्परता सर्वांना भावते. साधेपणा, प्रामाणिकता आणि लोकाभिमुख दृष्टिकोन या गुणांमुळे त्यांना समाजात आदराचे स्थान प्राप्त होते. त्यांनी सरपंच ते उपसभापतीपदी प्रामाणिकपणे काम केले. शेवटच्या क्षणापर्यंत विक्रमसिंह पाटणकर यांचे निष्ठावंत सहकारी म्हणून त्यांची असलेली ओळख सदैव स्मरणात राहील. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. रक्षाविसर्जन विधी रविवार २१ रोजी पाडळोशी येथे होणार आहे.

**-राजू पवार, पाटण**